# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०५/२०२५ (बुधवार)

---

**मा. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कृती आराखडा उपक्रमामध्ये नागपुर ग्रामीण जिल्हा असा एकमेव जिल्हा आहे ज्यांची पोलीस अधिक्षक, उपविभागिय पोलीस अधिकारी आणि पोलीस निरीक्षक या तिन्ही स्तरावर निवड झाली आहे.**

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतुन प्रशासनाला गतीमानता येण्यासाठी 'क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा हा उपक्रम सुरू करण्यात आला. सदर उपक्रम हा दि. ०७ जानेवारी २०२५ ते दि. १६ एप्रिल २०२५ दरम्यान राबविण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांचा समावेश होता. या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेचे मुल्यमापन हे 'भारतीय गुणवत्ता परिषद' (Quality Council Of India) या संस्थे मार्फत करण्यात आले. **त्यामध्ये पोलीस विभागा अंतर्गत संपुर्ण महाराष्ट्र राज्यातुन नागपुर ग्रामीण जिल्हा असा एकमेव जिल्हा आहे ज्यांची पोलीस अधिक्षक, उपविभागिय पोलीस अधिकारी आणि पोलीस निरीक्षक या तिन्ही स्तरावर निवड झाली आहे. पहील्या टप्प्यांमध्ये पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण ने संपुर्ण राज्यातुन व्दितीय क्रमांक मिळविला. दुसऱ्या टप्प्यांमध्ये पोलीस विभागा अंतर्गत नागपुर विभागतुन उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर आणि पोलीस निरीक्षक ,पोलीस स्टेशन उमरेड यांची प्रथम क्रमांकाने निवड झालेली आहे.**

**१०० दिवसाच्या या उपक्रमाच्या माध्यमातुन नागपूर ग्रामीण पोलीस दलाने नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरत नव्या तंत्रज्ञानाचा वापर, सेवा सुविधा आणि पारदर्शक कार्यपध्दती व्दारे महाराष्ट्र राज्यात तिन्ही स्तरावर उत्तम कामगिरी करून एक आदर्श निर्माण केला आहे.**

भारतीय गुणवत्ता परिषद्
QUALITY COUNCIL OF INDIA
Creating an Ecosystem for Quality

# कार्यालयीन मूल्यमापन

## 100 दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम

## सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेली महाराष्ट्रातील शासकीय कार्यालये

**पहिला टप्पा**

### सर्वोत्तम विभाग

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (१०० पैकी) |
|---|---|---|
| १ | महिला व बाल विकास विभाग | ८०.०० |
| २ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ७७.९५ |
| ३ | कृषी विभाग | ६६.१५ |
| ४ | ग्राम विकास विभाग | ६३.८५ |
| ५ | परिवहन व बंदरे विभाग | ६१.२८ |

### सर्वोत्तम आयुक्त / संचालक

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (१०० पैकी) |
|---|---|---|
| १ | संचालक, तंत्र शिक्षण | ७७.४३ |
| २ | आयुक्त, जमाबंदी | ७२.८६ |
| ३ | आयुक्त, आदिवासी विकास | ७२.५७ |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान | ७०.१८ |
| ५ | आयुक्त, वैद्यकीय शिक्षण | ६९.४३ |

### सर्वोत्तम जिल्हाधिकारी

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (१०० पैकी) |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, चंद्रपूर | ८४.२९ |
| २ | जिल्हाधिकारी, कोल्हापूर | ८१.१४ |
| ३ | जिल्हाधिकारी, जळगाव | ८०.८६ |
| ४ | जिल्हाधिकारी, अकोला | ७८.८६ |
| ५ | जिल्हाधिकारी, नांदेड | ६६.८६ |

### सर्वोत्तम पोलीस अधीक्षक

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (१०० पैकी) |
|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक, पालघर | ९०.२९ |
| २ | पोलीस अधीक्षक, गडचिरोली | ८०.०० |
| २ | पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण) | ८०.०० |
| ३ | पोलीस अधीक्षक, जळगाव | ६५.७१ |
| ४ | पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रामीण) | ६४.०० |

# ४. नागपूर विभाग

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | उप विभागीय अधिकारी | नागपूर (शहर) | ब्रह्मपुरी | एटापल्ली |
| २. | तहसिलदार | नागभीड | कारंजा (घा.) | साकोली |
| ३. | उप अधिक्षक, भूमि अभिलेख | साकोली | गडचिरोली | नगर भू.क्र.१, नागपूर |
| ४. | दुय्यम निबंधक | काटोल - २. | कारंजा (घा.), | नागपूर शहर - ८ |
| ५. | गट विकास अधिकारी | कामठी | देवळी | कुरखेडा |
| ६. | तालुका वैद्यकीय अधिकारी | नागभीड | हिंगणा | देवळी |
| ७. | उप विभागीय कृषि अधिकारी | नागभिड | रामटेक | साकोली |
| ८. | तालुका कृषि अधिकारी | नरखेड | कोरपना | पवनी |
| ९. | उप विभागीय पोलीस अधिकारी | १. सावनेर<br>२. देवरी | १. आर्वी<br>२. अहेरी | १. साकोली<br>२. तिरोडा |
| १०. | पोलीस निरिक्षक | १. उमरेड<br>२. गोंदिया | १. तळेगाव<br>२. आष्टी | १. बल्लारपूर<br>२. तिरोडा |
| ११. | वन परिक्षेत्र अधिकारी | पवनी | देवलापार, नागपूर | हिंगणा |
| १२. | प्रकल्प अधिकारी, ए. बा. वि. | गडचिरोली (ग्रामीण) | धानोरा | चार्मोशी |
| १३. | बाल विकास प्रकल्प अधिकारी (श) | नागपूर जिल्हा पूर्व | नागपूर शहर पूर्व | नागपूर शहर मध्य |
| १४. | बाल संरक्षण अधिकारी | नागपूर (ग्रामीण) | मूल, चंद्रपूर | गोंदिया (ग्रामीण) |
| १५. | उप अभियंता म.जी.प्रा. | उपविभाग - ४, नागपूर | ज.व्य.उपविभाग,नागपूर | उपविभाग बल्लारपूर |
| १६. | सहायक पशुसंवर्धन आयुक्त, तालुका लघु पशु सर्व चिकित्सालय | वर्धा | वडसा | उमरेड |
| १७. | पशुधन विकास अधिकारी | खेमजाई ता. वरोरा | वडेगाव ता. तिरोडा | ब्राम्हणवाडा ता. कारंजा |
| १८. | मुख्याधिकारी नगरपरिषद / नगर पंचायत | देसाईगंज | नागभीड | वाडी जि. नागपूर |
| १९. | उप अभियंता (सार्वजनिक बांधकाम) | मूल | कळमेश्वर | कुरखेडा |
| २०. | उप अभियंता (जलसंपदा) | कोच्छी बॅरेज उपविभाग क्र.२ खापा, नागपूर | गोसीखुर्द उजवा कालवा उपविभाग क्र. ४, वाही ता. पवनी | दिंडोरा प्रकल्प उप विभाग क्र.१, चंद्रपूर |
| २१. | उप अभियंता (महावितरण) | आर्वी | मूल | भंडारा शहर |
| २२. | उप विभागीय जलसंधारण अधिकारी | भंडारा | सालेकसा | राजुरा |
| २३. | सहायक निबंधक (सहकारी संस्था) | उमरेड | देवरी | मोहाडी |
| २४. | उप कोषागार अधिकारी | उमरेड | एटापल्ली | कुही |
| २५. | तालुका क्रीडा अधिकारी | मुलचेरा | देवळी | बल्लारपूर |
| २६. | वैद्यकीय अधिक्षक | तिरोडा | ब्रम्हपूरी | तुमसर |
| २७. | गट शिक्षण अधिकारी | रामटेक | समुद्रपूर | पवनी |

## डिझेल चा अवैधरित्या साठा करून ठेवणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## उपविभागिय पोलीस अधिकारी नागपुर विभाग यांची कारवाई

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक २१/०५/२०२५ रोजी श्री दिपक अग्रवाल , सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग नागपुर यांना गुप्तबातमीदार कडुन खात्रीशीर खबर मिळाली की, ईफरोज शेख नावाचा ईसम हा त्याचे राहते घरी मौजा रूईखैरी येथे जिवनावश्यक वस्तु डिझेल ची अवैधरित्या साठा करून स्वत:चे फायद्याकरिता खरेदी व विक्री करित आहे. अशा माहीतवरून श्री दिपक अग्रवाल हे त्यांच्या पथकासह घटनास्थळी रवाना झाले असता रूईखैरी येथे आरोपी नामे **मो. ईफरोज मोह. असलम शेख वय २७ वर्षे, रा. वार्ड क्र. ०३ रूईखैरी ता.जि.नागपूर** याचे घरी पंचसह पोहचुन पाहणी केली असता डबक्यांमध्ये जिवनावश्यक वस्तु डिझेल मिळुन आले. पोलीसांनी अधिक विचारपुस केली असता आरोपीने जवळ पासचे धाब्यावर येणा—रा ट्रक ड्रायव्हर लोंकाकडुन ओळखी करून सरकारी भावापेक्षा कमी भावात खरेदी करून त्याची अवैधरित्या साठवणुक करून स्वत:चा फायदया करीता सरकारी भावा पेक्षा कमी दरात विक्री करित असल्याचे सांगितले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) २२ पांढ—या रगांच्या कॅनमध्ये अंदाजे ४४० लिटर डिझेल किमती ४६,२००/— रू.,२) ०१ प्लॅस्टीक कॅनमध्ये १० लिटर डिझेल किंमती ११,०००/— रू. कॅन सह,३) ४५ प्लॅस्टीक किं ४,५००/— रू , ४)०१ संक्शन पाईप किमती १००/—रू.,५)०४ प्लॅस्टीक गाळणी (चाळणी) प्रति २००/—रू,६) एक ०५ लिटर क्षमतेचे टिनाचे माप किमती २००/— रू. तसेच डिझेलचा साठा करण्याकरीता वापरलेली वाहने ७)एक टिव्हीएस ज्युपीटर मोपेड क्र एम एच ४९ टि.सी डी०३३ किमती ५०,०००/रू, ८)एक हयुंडाई कंपनीची आय २० मॅग्ना चारचाकी कार क्र.एम एच ४३ ए.आर ५१४४ . किमती ७,००,०००/— रूपये वाहनाच्या डिक्की मध्ये ०१ प्लॅस्टीक कॅन मध्ये २० लिटर डिझेल किंमती २,०००/—रू. चे व ०२ कॅन प्रति कॅन १००/— रू. प्रमाणे किं २००/— रू एकुण किमती ७,०२,२००/— रूपये असा एकुण किंमती ८,०४,५००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन बोरी येथे कलम ३, ७ अत्यावशक वस्तु अधि. १९५५ सहकलम ८(१) पेट्रोलियम अधिनियम १९३४ सह.कलम २८७भा.न्या.स.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## १२ तासाच्या आत टि.एम.टी. बार (लोखंडी सरीया) चोरी करणारी टोळी अटक
## २१ लाख १८ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## मौदा पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन मौदाः— दिनांक १६/०५/२०२५ चे मध्यरात्री दरम्याण पो.स्टे. मौदा हद्दीतील कर्मभुमी इंडस्ट्रीयल लेआउट, महालमाव येथे रस्ते बांधकामा करीता ठेवलेले ११टन टिएमटी बार (लोहा) एकुण किंमती ६,१८,४००/— रूपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेल्याचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मौदा गुन्हे प्रकटीकरण पथाकाने तांत्रीक पध्दतीने तसेन गुप्त माहीतीच्या आधारे सदर गुन्हयाचा तपास करून अवघ्या १२ तासात गुन्हयाची उकल करून आरोपी नामे १) योगेश उर्फ बबलु शिवजीत शाहु, वय ३१ वर्ष रा. यशोधरानगर, नागपुर २) सुभाष रामदेव कुशवाह वय २३ वर्ष रा. कळमना नागपुर ३) अवदेश उर्फ राजा मैय्यादीन कुशवाह वय ३४ वर्ष ४)

**कुलदीप रामेश्वर कुशवाह वय २९ वर्ष ५) रामसिंग शिवचरण कुशवाह वय ३१ वर्ष तिन्ही रा. यशोधरानगर यांना ताब्यात घेवुन अटक करून त्यांच्या कडुन नागपुर गुन्हयात वापरलेले वाहन क्र. एम.एच.३१ डि.एस. १२७९ तसेच गुन्हयात चोरीस गेलेला ११ टन टिएमटी बार (लोखंडी सळाख) असा एकुण २१,१८,४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**




## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद पारशिवणी पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिणी** :— दिनांक २०/०५/२०२५ रोजी पारशिवणी पोलीस रात्रगस्त करीत असतांना पोलीसांनी गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, नवेगाव खैरी रोडने पारशिवणी शहराकडे बोलेरो पिकअप वाहनामध्ये गोवंश जनावरांचे अवैधरितत्या वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे **पोलीसांनी भागेमाहेरी पाईपलाईन नागठाणा येथील चौकात नाकाबंदी केली** असता नाकाबंदी दरम्यान एक बोलेरो पिकअप वाहन कं एम. एच. ४० सी.टी. ०६९२ हे वाहन मिळुन आले. वाहन थांबवुन पाहणी केली असता वाहनात चालकासह अजुन एक इसम बसुन होता. त्यांना नाव पत्ता विचारले असता वाहन **चालक नामे रविंद्र भाउराव चौधरी , वय ४३ वर्ष रा. वाघोडा ता पारशीवनी ,आणि त्याच्या बाजुला बसलेला आरोपी नामे राजु खान अस्लाम खान वय ३७ वर्ष रा. वार्ड क्र, ०४ भाजी मंडी सय्यद अली**

**नगर , पुराना कब्रस्तान कामठी जि.नागपुर अशी माहीती प्राप्त झाली** . पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता वाहनाच्या डाल्यामध्ये त्यामध्ये **९ गोवंश जनावरे** मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, गळयाला दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी नमुद आरोपीतांना गाडी मालकाबाबत विचारना केली असता सदर वाहन चालकाच्या मालकीचे असल्याची माहीती प्राप्त झाली आहे. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक बोलेरो पिकअप वाहन क्रं एम.एच. ४० सी.टी. ०६९२ किंमती ५,००,०००/— रू. व ९ गोवंश जनावरे किंमती ५६,००० /— रूपये असा एकूण किंमती ५,५६,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सुटका केलेल्या जनावारांच्या देखभालीकरीता त्यांना गोरक्षण केंद्र,रामटेक येथे दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन पारशिवणी येथे महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.पारशिवणी पोलीसांनी दोन्ही आरोपीतांना आटक केली आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने